# आर्थिक शिस्त लावणारे बजेट

आर्थिक क्षेत्र



**वाय. एम. देवस्थळी**

**अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, एल अँड टी फायनान्स होल्डिंग्ज**

यंदाचे बजेट दिशादर्शक आणि बदलांची नांदी ठरविणारे आहे. देशाचा आर्थिक विकास आणि भवितव्य यांची सांगड घालून अर्थमंत्र्यांनी संतुलन साधण्याचा केलेला प्रयत्न नक्कीच स्तुत्य आहे. आर्थिक शिस्त घालून घेण्याचा शिरस्ता यंदाही त्यांनी कायम ठेवला आहे.

नियोजित भांडवली गुंतवणुकीच्या आधारेच देशातील पायाभूत सुविधा क्षेत्रात महत्वपूर्ण बदल घडून येणार आहेत. या क्षेत्राच्या विकासासाठी यापूर्वी बरेच प्रयत्न करण्यात आले आहेत. या शिवाय यंदाच्या बजेटमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर बाँड, पीपीपी मॉडेल आदी प्रयत्नांवर भर देण्यात आला आहे. 'नॅशनल इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर फंड'ची निर्मिती करण्यात आली असून, त्या माध्यमातून पायाभूत सुविधांच्या विकासासाठी २०,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नव्याने पाच अल्ट्रा मेगा पॉवर प्रोजेक्ट उभारण्यात येणार असून, प्रत्येकाची वीजनिर्मिती क्षमता ४,००० मेगावॉटची असणार आहे. वस्तू आणि सेवाकराच्या अंमलबजावणीबाबत जेटली यांनी स्पष्ट संकेत दिले असून, कॉर्पोरेट कर कमी करून उद्योगांना मोठा दिलासाच देण्याचा हा प्रयत्न आहे. 'गार'च्या अंमलबजावणीला दोन वर्षांची मुदतवाढ दिली आहे. संरक्षणखर्चामध्ये भरीव वाढ करून 'मेक इन इंडिया'या प्रोत्साहन देण्याचा उपक्रम प्रशंसनीय आहे. स्वतंत्र अस्तित्व असणाऱ्या बँक बोर्ड ब्युरोची स्थापना करून सार्वजनिक बँकांच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आणि गती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

सोन्यातून कमाई करण्याचा नवीन पर्याय उपलब्ध करून देण्यात आला असून, नॅशनल पेन्शन स्कीमद्वारे बचतीद्वारे संपत्ती निर्माणाची संधी देण्यात आली आहे. या शिवाय काळ्या पैशाच्या निर्मितीला प्रतिबंध घालण्यासाठी सरकारने पावले उचलली आहेत. त्यासाठी डिजिटल फंड ट्रान्स्फरलाही प्रोत्साहन देण्यात आले आहे. या माध्यमातून अर्थव्यवस्थेत पैसा खेळता कसा राहील, याकडेही लक्ष देण्यात आले आहे. अतिश्रीमंतांवरील सरचार्ज तसाच ठेवून संतुलन साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. बचतीच्या योजनांना प्रोत्साहन देऊन त्या मार्गाने येणार निधी उत्पादन क्षेत्रासाठी वापरण्याच्या प्रयत्नांना दादच द्यायला हवी. एकंदरीतच हे बजेट म्हणजे देशाला पुन्हा विकासाच्या आणि भरभराटीच्या राजमार्गावर नेण्याच्या सर्वोच्च अपेक्षेचे प्रतीकच ठरले आहे.